**ठळक बातम्या**

- देशव्यापी क्षयरोग निर्मूलन अभियानाचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- जगात कुठेही भू-राजकीय संघर्ष झाला तरी भारतावर त्याचे थेट परिणाम होतात असं परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र विधिमंडळाच्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात १७३ सदस्यांच्या शपथविधीनंतर कामकाज स्थगित, अध्यक्षांची निवड येत्या सोमवारी

- यंत्राद्वारे मतदान प्रक्रियेला विरोध दर्शवत महाविकास आघाडीच्या आमदारांचा शपथविधीवर बहिष्कार

आणि

- सक्तवसुली संचालनालयाच्या कारवाईत अहमदाबाद आणि मुंबईत ७ ठिकाणांवर साडे तेरा कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त

**<><><><><>**

देशव्यापी क्षयरोग निर्मूलन अभियानाला आज केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते हरयाणात पंचकुला इथं प्रारंभ झाला. देशातली ३३ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतल्या मिळून ३४७ जिल्ह्यांत आजपासून १०० दिवस ही मोहिम राबवली जाणार आहे. यात

क्षयरोगाविषयी जनजागृती करणं आणि क्षयरोगाबद्दलच्या गैरसमजुती दूर करणं यांचा समावेश आहे.

२०२५ पर्यंत देश क्षयरोगमुक्त करण्यासाठी कोणतीही कसर सोडली जाणार नाही असं नड्डा त्यांनी सांगितलं. क्षयरोगरुग्णांना आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ मिळत असल्याचंही ते यावेळी म्हणाले. या मोहिमेत क्षयरोगाचे नवीन रुग्ण शोधणं, गंभीर आजारी असलेल्या रुग्णांसाठी आधुनिक उपचार तसंच पोषक आहार देण्यावर भर देण्यात येणार आहे.

क्षयरोगाचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करून १०० दिवसांची विशेष मोहीम सुरु केल्यानं क्षयरोगाविरोधात देशाचा लढा अधिक बळकट झाला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. क्षयरोग निर्मूलनासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अहमदाबाद इथं आयोजित बीएपीएस कार्यकर्ता सुवर्ण महोत्सवाला दूरदृश्य प्रणालीमार्फत संबोधित केलं. रशिया युक्रेन युद्धादरम्यान भारतीयांना सुरक्षित मायदेशी परतण्यात बीएपीएस च्या कार्यकर्त्यांनी केलेल्या मदतीची प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली. भारताच्या ‘एक पेड माँ के नाम’ मोहिमेची जगभरात चर्चा होत असल्याचं त्यांनी सांगितलं. अबू धाबीमध्ये नुकत्याच उभारण्यात आलेल्या स्वामीनारायण मंदिरासारख्या उपक्रमातून जग भारताची सांस्कृतिक विविधता आणि अध्यात्मिक वारसा जाणून घेत आहे, असंही ते म्हणाले.

युवकांसाठी विकसित भारत युवा नेते संवाद कार्यक्रम येत्या जानेवारीमध्ये आयोजित केला जाणार असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम इथं आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, मंत्रिमंडळाचे इतर सदस्य उपस्थित होते. जगभरातल्या ३० देशांमधले एक लाखापेक्षा जास्त कार्यकर्ते या कार्यक्रमात सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

जगात कुठेही भू-राजकीय संघर्ष झाला तरी भारतावर त्याचे थेट परिणाम होतात असं परराष्ट्रव्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. कतारमधे दोहा फोरम २०२४ या चर्चासत्रात संघर्ष समेटाचं नवीन युग या विषयावर ते बोलत होते. भूमध्य सागरी प्रदेशात भारतीय वंशाचे सुमारे ५० हजार लोक राहतात, तर आखाती देशांमधे ही संख्या एक कोटीच्या आसपास आहे असं त्यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय संघर्षात भारताची भूमिका पारंपरिक मध्यस्थ म्हणून सीमित नाही तर संघर्षग्रस्त देशात संवादसुरु करण्यासाठी पुढाकार घेण्याची आहे, असं ते रशिया युक्रेन संघर्षाच्या संदर्भात म्हणाले.

**<><><><><>**

पश्चिम आशियाई देशातली सद्यस्थिती लक्षात घेता, पुढील सूचना मिळेपर्यंत भारतीय नागरिकांनी सीरियाचा प्रवास टाळावा तसंच शक्य असल्यास सिरियातून बाहेर पडावं, असा सल्ला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिला असून, याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत विविध शेतकरी संघटना आणि आघाडीच्या कृषी अर्थतज्ज्ञांशी अर्थसंकल्पपूर्व दुसरी बैठक झाली. या बैठकीला अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते.

<><><><><>

देशातला इलेक्ट्रिक वाहन उद्योग २०३० पर्यंत सुमारे ४ कोटी रोजगार निर्माण करणारं क्षेत्र बनेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे. ते आज नागपूरमध्ये राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालयात 'इलेक्ट्रिक वाहनातल्या आगीच्या दुर्घटनांचं व्यवस्थापन' या विषयावरच्या कार्यशाळेत बोलत होते.

<><><><><>

भारतीय सशस्त्र सेना दलांनी देश संरक्षणासाठी दाखवलेला पराक्रम कायम प्रेरणादायी आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही भारतीय सैन्य दलाच्या धैर्य, पराक्रम, समर्पण आणि त्यागाला वंदन केलं. देशवासियांनी सशस्त्र सेना ध्वज निधीत योगदान द्यावं, असं आवाहन प्रधानमंत्री आणि संरक्षणमंत्र्यांनी केलं.

हा निधी वीर जवानांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी तसंच सेवानिवृत्त जवानांच्या पुनर्वसनासाठी वापरला जातो.

<><><><><>

महाराष्ट्र विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या आजच्या पहिल्या दिवशी तात्पुरते अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी कामकाजाला सुरुवात केली. चैनसुख संचेती, जयकुमार रावल, माणिकराव कोकाटे आणि आशीष जयस्वाल या तालिका सदस्यांना शपथ देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह १७३ सदस्यांचा शपथ विधी आज झाला. उद्या उर्वरित नवनिर्वाचित आमदारांना शपथ देण्यात येईल. विधानसभा अध्यक्षांची निवड येत्या सोमवारी होईल.

दरम्यान, ईव्हीएमद्वारे मतदान प्रक्रियेला विरोध म्हणून विरोधी पक्षांच्या नवनिर्वाचित आमदारांनी शपथविधीवर बहिष्कार टाकला. समाजवादी पक्ष आणि इतर चार आमदार वगळता विरोधी बाकांवरच्या आमदारांनी शपथ घेतली नाही.

<><><><>

सक्तवसुली संचालनालयानं आज अहमदाबाद आणि मुंबईत ७ ठिकाणांवर छापे टाकून साडे तेरा कोटी रुपयांची रोकड जप्त केली. बँक ऑफ महाराष्ट्र आणि नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतल्या खात्यांद्वारे शेकडो कोटी रुपयांचे व्यवहार विविध कंपन्यांकडे हस्तांतरित करण्यात आल्याचं तपासात आढळलं आहे.

<><><><>

दिल्ली पोलिसांनी आंतरराज्य अंमली पदार्थ तस्करीच्या कारवाईत एकाला अटक केली असून दोन किलोहून अधिक उच्च प्रतीचा चरस जप्त करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांकडून राबविण्यात येत असलेल्या 'नशामुक्त भारत' अभियानांतर्गत गेल्या १५ दिवसांत सुमारे ५५ किलो गांजा,

७ हजार ८०० क्वार्टर अवैध दारू, दोन किलोहून अधिक चरस आणि ११ ग्रॅम स्मैक जप्त करण्यात आली आहे.

<><><><><>

बॉर्डर-गावस्कर करंडक  क्रिकेट कसोटी मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात आज दिवस अखेर भारताच्या दुसऱ्या डावात ५ बाद १२८ धावा झाल्या होत्या. ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ३३७ धावांवर आटोपला. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियानं भारतावर १५७ धावांची आघाडी घेतली आहे. पाच कसोटी सामन्यांच्या या मालिकेत सध्या भारत १-० नं पुढे आहे. पर्थ इथं झालेल्या पहिल्या कसोटीत भारतानं ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी मोठा विजय मिळवला होता.

<><><><><>

कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पाच लाख धावांचा टप्पा गाठणारा इंग्लंड हा जगातला पहिला संघ ठरला आहे. एकूण १ हजार ८२ सामने खेळून आणि ७१७ खेळाडूंच्या  सहभागातून इंग्लंडनं हा विक्रम नोंदवला आहे. इंग्लंड संघाने १८७७ मध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्ध पहिली कसोटी खेळली होती. जागतिक क्रिकेटमध्ये सर्वाधिक कसोटी सामने खेळणारा संघही इंग्लंड आहे. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक धावा करणाऱ्या संघांमध्ये दुसरा क्रमांक ऑस्ट्रेलिया संघाचा तर भारतीय संघाचा तिसरा क्रमांक लागतो. ऑस्ट्रेलिया संघाच्या ४ लाख, २८ हजार ८१६ धावा

आहेत. ५८६ कसोटी सामने खेळलेल्या भारताने ३१६ खेळाडूंच्या सहभागातून २,लाख ७८ हजार, ७५१ धावा केल्या आहेत.

**<><><><><>**

दुबई इथं सुरु असलेल्या १९ वर्षाखालील पुरुषांच्या आशिया क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत उद्या भारत आणि बांग्लादेश यांच्यात भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी साडे दहा वाजता अंतिम सामना होणार आहे. बांग्लादेशनं गेल्या वेळी संयुक्त अरब अमिरातीला हरवत या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं होतं.

**<><><><><>**

दूरदर्शनच्या  ओटीटी व्यासपीठामुळे प्रेक्षकांना निखळ मनोरंजन मिळेल तसंच प्रसारभारतीला आपल्या प्रेक्षकांची व्याप्ती वाढवण्यास मदत होईल, असं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सहगल यांनी सांगितलं. अहमदाबाद इथं दूरदर्शनच्या  कार्यालयाला आज भेट दिल्यानंतर ते बोलत होते. ओटीटीद्वारे नवे कार्यक्रम प्रेक्षकाच्या भेटीला येतीलच तसंच जुन्या कार्यक्रमांचा आनंदही लुटता येईल, असं सहगल यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**